जय शिवराय एज्युकेशन सोसायटी,मुरगूड संचलित



# सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय,मुरगूड

# झेप

कॉलेज विश्वातील एक विश्वसनीय अनियतकालिक

• संस्थापक : मा.खास.सदाशिवराव मंडलिक

• संपादक : प्र.प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे

• कार्यकारी संपादक : प्रा. सुशांत पाटील

• वर्ष १५ वे • मार्च २०२५ • पाने सहा • स्वागतमुल्य १ रुपये पान नं.१

## अपार निष्ठा, त्याग व वात्सल्याच्या मूर्ती : स्वर्गीय सौ. विजयमाला मंडलिक



### ४४ व्या स्मृतिदिनानिमित्त

**मुरगूड (वार्ताहर) :**

नि:स्वार्थी, त्यागपूर्वक जनतेची सेवा करून आपले आयुष्य खडतरपणे घालविणाऱ्या स्वर्गीय विजयमाला सदाशिवराव मंडलिक यांचा ४४ वा स्मृतिदिन विविध कार्यक्रमांनी साजरा होत आहे.

कोल्हापूरात (राजारामपुरी) श्री. रामचंद्र मोरे या सामान्य कुटूंबात विजयमालाबाईंचा जन्म झाला. त्यांचा खासदार सदाशिवराव मंडलिक यांच्याशी १९ मे १९६३ रोजी विवाह झाला. तेव्हापासून खासदार मंडलिक यांच्या व्यापक समाजहिताच्या कार्यात त्या सतत कार्यरत राहिल्या. प्रारंभीच्या काळात मुरगूड येथील खासदार मंडलिक यांनी स्थापन केलेल्या जय शिवराय एज्युकेशन संस्थेच्या शिवराज हायस्कूलमध्ये हिंदी विषयाच्या शिक्षिका म्हणून त्यांनी ज्ञानदानाचे सेवाभावी काम केले. शाळेतील मुलांच्या सहवासात त्या सूर्यविकासी कमळाप्रमाणे आपोआप उमलून हसू लागत. बाईना पाहून शाळेतील मुला-मुलींना आपली आई भेटल्याचा आनंद होई. शाळेतील सर्व मुले हृदयाची कवाडे उघडून आपल्या कौटुंबिक जीवनातील सुख-दु:खाच्या, घरच्या परिस्थितीच्या मनमोकळे स्वच्छंदीपणाने त्यांच्याशी हितगुज करीत असत. बाईंचा विषय हिंदी जरी असला तरी मराठीतील कवी 'यशवंत' यांची 'आई' ही कविता त्या फार तन्मयतेने शिकवत असत. गोरगरीब मुला-मुलींनी शिकले पाहिजे, असा त्यांचा ध्यास होता. बाईंच्या अध्यापनाचा अनुभव घेतलेले अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी बाईंच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याबद्दल आजही भरभरून कौतुकाने सांगतात.

खासदार सदाशिवराव मंडलिक यांच्या अनेक राजकीय, सामाजिक, शैक्षणिक सुख-दु:खांच्या खडतर परिस्थितीमध्ये बाईंनी आपल्या मनाचा तोल ढळू दिला नाही. कागल तालुक्याच्या अनेक गावागावात पायी फिरून बाईंनी मंडलिक साहेबांचा प्रचार केला. मंडलिक साहेबांच्या पुरोगामी, ध्येयवादी, स्पष्टवक्तेपणा, स्वच्छ चारित्र्य, जिद्दी, लढाऊ, स्वाभिमानी आणि जनसामान्यांबद्दल प्रचंड तळमळ या सर्व चांगल्या गुणांच्या प्रेरणास्थानी बाईच होत्या. साहेबांच्या खडतर जीवनप्रवासात विजयमालाबाईंचा फार मोठा आधार होता. बाईंनी स्वच्छ मनाच्या सदाशिवराव मंडलिक यांच्या बरोबर अपार कष्ट करून निष्ठेने संसार केला. साहेबांचा ध्येयवाद आणि स्वाभिमान बाईंनी जपला. सुख-दु:खाचे प्रसंग येऊनही मुरगूडच्या वातावरणाशी, इथल्या मातीशी, सामान्य जनतेशी बाईंचे अतूट जिव्हाळ्याचे नाते होते. पण नियतीला हे मान्य झाले नाही. हसत खेळत आपल्या साहेबांच्या, मुलांच्या समवेत भरला संसार करणाऱ्या बाईंचा दुर्दैवाने मंगळवार दि. ३१ मार्च १९८१ रोजी मृत्यु झाला. कागल तालुक्यात प्रत्येक गावा गावात हळहळ व्यक्त झाली. जिल्ह्यातील मंडलिक साहेबांच्यावर प्रेम करणारी सामान्य माणसे दु:खी झाली. अंत्यसंस्कारावेळी प्रचंड जनसमुदायाला आपल्या घरातील आई गेल्याचं दु:ख झालं. प्रत्येकाच्या डोळ्यातून आसवं गळू लागली.

बाईंच्या मुलांच्या निरागस चेहऱ्याकडे पाहून माणसांच्या डोळ्यातून आसवांचे झरे वाहू लागले. साहेबांनाही फार दु:ख झाले. साहेबांची मुले आईविना पोरकी झाली. भरला संसार सोडून आई देवाघरी गेली. आई ही मायेची सावली असते, वात्सल्याचा सागर असते, तिच्या कुशीतच बालपणीच्या पंखांना उडण्याचे बळ येते. कर्तृत्वाला बहर येतो हे खरे असले तरी मुलांना आईच्या मायेची, तिच्या वात्सल्याची गरज होती,तेव्हाच आई मुलांना सोडून गेली. या काळात या दु:खी वातावरणाशी व भावजीवनाशी एकरूप होऊन खा. मंडलिक साहेबांनी सर्वांना धीर दिला. साहेबांची कन्या सुजाता जाधव (दिदी) यांचा या लहान भावंडाना वाढविण्यामध्ये मोठा सिंहाचा वाटा आहे. याकाळात आजोबा, आजींचाही मानसिक आधार, माया व सहवास त्यांना मिळाला होता. विजयमालाबाईंच्या प्रेरणा अदृश्य रूपाने साहेबांच्या वर्तमान जीवन प्रवाहाला खंबीरपणे साथ देत आहेत. बाईंची भावमूर्ती, इच्छापूर्ती, त्यांचा मुलगा मा. खासदार प्रा. संजय मंडलिक, मुली, सून, नातंवंडाच्या जीवनातून आजही अदृश्यरूपाने दिसून येत आहेत. बाईंच्या स्मृतीदिनी आजही तालुक्यातील गोरगरीब लोक दु:खी होतात, हळहळ व्यक्त करतात. आज आमच्या माता विजयमाला बाई पाहिजे होत्या. हे सगळे वैभव त्यांनी पाहिले असते,अशी आर्त कळकळ सामान्य माणसं बोलून दाखवतात.

आजच्या वर्तमान जीवनातील राजकीय नेत्यांच्या जीवनामध्ये डोकावत असताना थोडं थांबावं लागतं. पण विजयमाला मंडलिक आणि खासदार सदाशिवराव मंडलिक यांच्या वैवाहिक जीवनातील प्रेम-जिव्हाळा पत्नीच्या मृत्यूनंतरही मंडलिक साहेबांनी जपला. शुद्ध,निष्कलंक,आदर्श चारित्र्याचा उत्तम नमुना म्हणून आज महाराष्ट्रातील अनेक नेते, युवक, कार्यकर्ते दिवंगत खासदार मंडलिक साहेबांच्या जीवनप्रवासाकडे पाहतात. विजयमालाबाईंच्या मुली सुजाता, सुस्मिता व सुनेत्रा, मुलगा मा.खासदार प्रा.संजयदादा मंडलिक व सून सौ.वैशाली मंडलिक, नातवंडे विरेंद्र, यशोवर्धन, समरजीत मंडलिक हे आजही बाईंचे आणि साहेबांचे शैक्षणिक व समाजकार्य निरपेक्ष वृत्तीने करीत आहेत. सामान्यांच्या हितासाठी जनसामान्यांबद्दलचे प्रेम, जिव्हाळा जोपासणे हिच खऱ्या अर्थाने त्यांना आदरांजली ठरेल.

सय येते आम्हा आनंदाच्या क्षणी तुमची |
पापण्यांत गोठवितो आम्ही नदी आसवांची ||
स्वर्गीय विजयमालाबाईंच्या पवित्र स्मृतीस
मन:पूर्वक अभिवादन.

-डॉ.शिवाजी होडगे
प्रभारी प्राचार्य

## लोकनेते स्व.खासदार सदाशिवरावजी मंडलिक साहेबांच्या १० व्या स्मृतीदिनी विनम्र आदरांजली



कारखाना कार्यस्थळावर मंडलिक साहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करताना मा.खासदार संजयदादा मंडलिक, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे, जिल्हा मुद्रांक अधिकारी बाबासाहेब वाघमोडे, ॲड. विरेंद्र मंडलिक व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

लोकसेवेचा, समाजकारणाचा समृद्ध ठेवा जपणारे जनसामान्यांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे लोकनेते स्व. खासदार सदाशिवरावजी मंडलिक साहेबांच्या १० व्या स्मृतीदिनी कारखाना कार्यस्थळावर उपस्थित राहून साहेबांना आदरांजली वाहिली. याप्रसंगी आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर लोकनेते सदाशिवराव मंडलिक यांनी दूधगंगेचे पाणी वेदगंगेत सोडणे, चिकोत्राची उभारणी, शिक्षण संस्थांचे निर्माण केलेले जाळे, सहकाराचे लावलेले रोपटे यातून शाश्वत कामे केली आहेत, त्यामुळे जिल्ह्यामध्ये आपल्या कार्याच्या माध्यमातून मंडलिकांनी जे उपकारकेलेले आहेत, त्याची भरपाई करणे अशक्यच आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे यांनी केले. साहेबांच्या १० व्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात जिल्हा मुद्रांक अधिकारी बाबासाहेब वाघमोडे प्रमुख उपस्थित होते. यावेळी प्रमुख मान्यवरांसह कारखान्याचे अध्यक्ष मा.खास. संजयदादा मंडलिक, उपाध्यक्ष आनंदराव फराकटे, युवासेना पश्चिम महाराष्ट्र निरीक्षक ॲड.विरेंद्र मंडलिक, आर.डी.पाटील-कुरुकलीकर, एम.आर.चौगुले, के.डी.शिंदे, भगवान पाटील, विश्वास कुराडे, मारुतीराव काळूगडे, अविनाश चौगुले यांच्यासह संचालक, साहेबांवर प्रेम करणारे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## श्रमसंस्कारातून सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होते : ॲड. विरेंद्र मंडलिक

### सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे चिमगावात श्रमसंस्कार शिबिर संपन्न



चिमगाव येथील श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन करताना संस्थेचे कार्याध्यक्ष मा. ॲड.विरेंद्र मंडलिक भैय्या, प्र.प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे,सरपंच दीपक आंगज व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

'सर्वांगीण आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या विकासाबरोबरच सामाजिक बांधिलकीची जाणीव, सेवाभावाची वृत्ती, श्रम, सेवा, त्यागाची भावना श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून निर्माण होते आणि या शिबिराच्या माध्यमातून यशाच्या शिखरावर पोचता येते असे मत, कार्याध्यक्ष ॲड. विरेंद्र मंडलिक यांनी व्यक्त केले. चिमगाव, ता.कागल येथे मुरगूड येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या वतीने आयोजित विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे नारायण गणपतराव मुसळे, बाजीराव आंगज,शामराव मोरबाळे, सागर आंगज, एस.एन.आंगज, पी.बी.आंगज प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महा-विद्यालयाचे कार्यतत्पर प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे होते. त्यांनी आपल्या मनोगतात शिबिरार्थींना निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिराचे महत्व सांगून शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी चिमगाव गावचे लोकनियुक्त सरपंच दीपक आंगज यांनी ३३ वर्षानंतर आपल्या खेडेगावात होत असलेल्या श्रमसंस्कार शिबिराचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. या सातदिवसीय निवासी शिबिरात "युवकांचा ध्यास - ग्रामीण विकास" ही थीम घेऊन ग्रामविकासासाठी पूरक अशा विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.डी.जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ.एम.ए.कोळी यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.संजय हेरवाडे यांनी केले. यानिवासी शिबीराचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.दिगंबर गोरे,प्रा.रामचंद्र पाटील, प्रा.विश्वनाथ चौगले,प्रा.सुशांत पाटील, प्रा.सुरज मांगले, प्रा.तृप्ती गवाणकर, प्रा.शीतल मोरबाळे यांनी केले होते.

सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सेक्रेटरी मा.खासदार संजयदादा मंडलिक, कार्याध्यक्ष मा.विरेंद्र भैय्या मंडलिक, संस्थेचे अध्यक्ष मा.गजाननराव गंगापुरे, कार्यवाह मा.आण्णासो थोरवत यांची प्रेरणा तसेच महाविद्यालयातील सर्व घटक आणि ग्रामस्थ यांचे विशेष सहकार्य लाभले.



# सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय,मुरगूड

• वर्ष १५ वे • मार्च २०२५ • पान नं.२



# सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न




राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना संस्थेचे कार्याध्यक्ष मा. ॲड. विरेंद्र भैय्या मंडलिक,यावेळी उपस्थित प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. शिवाजी जाधव, प्र.प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

दिवंगत लोकनेते माजी खासदार सदाशिवराव मंडलिक यांच्या ९० व्या जयंतीनिमित्त येथील मंडलिक महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन मोठ्या दिमाखात पार पडले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष जय शिवराय एज्युकेशन संस्थेचे कार्याध्यक्ष मा. ॲड. विरेंद्र भैय्या मंडलिक आणि प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले शिवाजी विद्यापीठातील जनसंवाद व पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. शिवाजी जाधव यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून स्पर्धेचे उद्घाटन संपन्न झाले. यावेळी कार्यक्रमाचे स्वागतपर प्रास्ताविक स्पर्धा समन्वयक प्रा. महादेव बेनके यांनी केले. यावेळी त्यांनी विविध महाविद्यालयांतून आलेल्या सर्व स्पर्धकांचे स्वागत केले. यावेळी प्रमुख मान्यवरांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख प्रा.डॉ. अद्वैत जोशी लिखीत 'श्रीमद भगवद्गीतेतील योगदर्शन' या पुस्तकाचे तसेच महाविद्यालयातील 'झेप' या अनियतकालिकाच्या १४ व्या अंकाचे प्रकाशन प्रमुख मान्यवर ॲड. विरेंद्र भैय्या मंडलिक व प्रा.डॉ. शिवाजी जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रा.डॉ. शिवाजी जाधव म्हणाले की, आज महाविद्यालयांकडून वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन फारसे होताना दिसत नाही. पण मंडलिक महाविद्यालयाने साहेबांचा विचारांचा वारसा अविरत गेली २३ वर्ष या स्पर्धाआयोजित करून जोपासल्याबद्दल त्यांनी संयोजकांचे अभिनंदन केले. तसेच सदाशिवराव मंडलिक हे सुध्दा एक उत्कृष्ट वक्ते होते आणि त्यांच्या जयंतीदिनी या वक्तृत्व स्पर्धांचे केलेलेआयोजन ही त्यांना दिलेली शाब्दिक, वैचारिक व कलेला वाव देणारी आदरांजली आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ॲड. विरेंद्र भैय्या मंडलिक म्हणाले की, अनेक नेत्यांनी केवळ वक्तृत्व कलेच्याआधारावर आपली राजकीय कारकीर्द घडवली, स्वत: मंडलिक साहेबांनी वक्तृत्वाच्या माध्यमातून संसदेमध्ये वंचितांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडून न्याय मिळवून दिला. विधिमंडळातील त्यांची अनेक भाषणे आजही एक आदर्श वक्तृत्वाचे उदाहरण म्हणून ऐकली जातात. त्यामुळे पुन्हा मंडलिक साहेबांसारखे वक्ते घडवायचे असतील तर अशा वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन महत्त्वाचे आहे, असे मत नोंदवून यानिमित्ताने त्यांनी स्पर्धेच्या आयोजनाबद्दल संयोजकांचे कौतुक केले आणि सहभागी सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, तुम्ही जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात करिअर करत असताना तुम्हाला तुमच्या वक्तृत्वाच्या मदतीने अनेक संधींचे सोने करता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सदर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत गडहिंग्लज येथील शिवराज महाविद्यालयाचा विद्यार्थी चारुदत्त माळी याने सदाशिवराव मंडलिक चषक मिळवून स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. त्याला रोख पाच हजार एक चषक व प्रमाणपत्र तर द्वितीय क्रमांक महाराष्ट्र प्रशासकीय महाविद्यालय गडहिंग्लजची कु. अमृता सागर तृतीय क्रमांक मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगलीची विद्यार्थिनी प्रज्ञा माळकर यांनी मिळवला तर उत्तेजनार्थ पाच पारितोषिके अनुक्रमे कर्मवीर हिरे गारगोटी कॉलेजचा विद्यार्थी चैतन्य कांबळे, डी के टी ई कॉलेज इचलकरंजीची कु. ऋतुजा पवार, कला महाविद्यालय कोवाड कु. गायत्री बिरजे,सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाची विद्यार्थिनी मधुरा जाधव, दूधसाखर महाविद्यालय बिद्रीचा विद्यार्थी शिवप्रसाद पाटील अशी पाच पारितोषिके उत्तेजनार्थ मिळवली. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ जय शिवराय एज्युकेशन संस्थेचे कार्यवाह अण्णासाहेब थोरवत व महा- विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ. शिवाजी होडगे व इतर मान्यवर यांच्या शुभहस्ते घेण्यात आला.सदर स्पर्धेसाठी टाईमकीपर म्हणून प्रा.डी.व्ही. गोरे व प्रा. सुशांत पाटील यांनी काम पाहिले.

यावेळी कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थित शेखर मंडलिक, कार्यवाह अण्णासो थोरवत, प्रा.डॉ. यु.आर. शिंदे, प्रा. पांडुरंग सारंग, प्रा.डॉ. किरण पवार, प्रा.डॉ. माणिक पाटील, प्रा.डॉ. शिवाजी पोवार, प्रा.डी.ए. सरदेसाई, प्रा. व्ही.ए. प्रधान, प्रा. रामचंद्र पाटील, प्रा. नितेश रायकर, प्रा. धनाजी खतकर, प्रा. विश्वनाथ चौगले, प्रा. सोनाली कुंभार व सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच स्पर्धक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय हेरवाडे व प्रा. तृप्ती गवाणकर यांनी केले तर आभार प्रा.डॉ.एम.ए.कोळी यांनी मानले.

## मयूर मोकाशीची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड



आंतर विद्यापीठ खेळाडू मयूर मोकाशी याचा सत्कार करताना कार्यवाह अण्णासो थोरवत,प्र.प्राचार्य शिवाजी होडगे, प्रा.डॉ.शिवाजी पोवार व इतर

**मुरगूड (वार्ताहर) :**

अनुक्रमे कोल्हापूर व जयसिंगपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या कोल्हापूर विभागीय व आंतरविभागीय तायक्वांदो स्पर्धेत मुरगूड येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचा खेळाडू कु. मयूर मोकाशी याने ८७ किलो वरील वजनी गटात तायक्वांदो या स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. या खेळाडूची निवड अमृतसर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेकरिता झालेली आहे. या खेळाडूचा सत्कार जय शिवराय एज्युकेशन सोसायटी, मुरगूडच्या वतीने कार्यवाह अण्णासो थोरवत यांच्या हस्ते बुके देऊन करण्यात आला. यावेळी प्र. प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, जिमखाना प्रमुख प्रा.डॉ. शिवाजी पोवार, जे.के. भोसले, सुनील मंडलिक व इतर उपस्थित होते. या खेळाडूला जिमखाना चेअरमन प्रा. डॉ. शिवाजी पोवार यांचे मार्गदर्शन लाभले तर मा. खासदार प्रा. संजय मंडलिक, ॲड. विरेंद्र मंडलिक, कार्यवाह अण्णासो थोरवत, प्र. प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांचे प्रोत्साहन मिळाले.

## वाकी घोल व डवरवाडी येथे वसुंधरा बचावाचे जागरण




'वनस्पती व वन्यजीव यांचे संरक्षण' या कार्यशाळे प्रसंगी उपस्थित महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी.

**मुरगूड (वार्ताहर) :**

वनस्पती मानवी जीवनातील सांस्कृतिक महत्त्व,परंपरा व पर्यावरणाचे संरक्षण,मानवाची भूमिका कशी असावी याबद्दलचे मार्गदर्शन न्यू कॉलेजचे वनस्पती शास्त्रज्ञ प्रो.व्ही.बी.शिंपले सर यांनी केले तसेच वन्यजीव प्राणी,पक्षी व दुर्मिळ औषधी वनस्पतींचे संरक्षण युवा पिढीने करणे आजच्या युगात महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन पर्यावरण तज्ञ सुहास वायंगणकर यांनी केले. ते अंबाबाई देवराई, डवरवाडी व व्यंकनाथ देवराई, वाकी घोल येथे 'वनस्पती व वन्यजीव यांचे संरक्षण' या विषयी कार्यशाळेत बोलत होते. श्री.यशवंतराव पाटील विज्ञान महाविद्यालय, सोळांकूर, किर्लोस्कर ऑईल इंजिन्स व लक्ष्मी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सोळांकुर, भोगावती, सरवडे, बिद्री, गारगोटी, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड येथील शंभराहून अधिक विद्यार्थ्यांना वसुंधरा संरक्षण कसे करावे, याविषयी माहिती दिली. किर्लोस्कर इंजिनचे डे.मॅनेजर शरद अजगेकर,लक्ष्मी फाउंडेशनचे अध्यक्ष विनायक देसाई यांच्या विशेष सहकार्यामुळे कार्यक्रम संपन्न झाला.सदर कार्यक्रमात डॉ.संतोष मधाळे, डॉ.विश्वजीत लगाडे, डॉ.मनिषा सुतारे, डॉ.सुधीर दुरगुडे, डॉ.सागर व्हनाळकर, डॉ.विलास जगताप, डॉ.उदय पाटील, डॉ.नलवडे, डॉ.भगत, लेफ्टनंट समीर घोडके, प्रा. सुजित साठे, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे जीवशास्त्र विभाग प्रमुख प्रा.अभिजीत कांबळे, सहा.प्रा.सोनाली बाबर तसेच विविध महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## " महिलांनी आपले मन व शरीर निरोगी ठेवणे आवश्यक आहे " डॉ. सुप्रिया गोखले

### सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयामध्ये जागतिक महिला दिन संपन्न






जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी बोलताना डॉ. सुप्रिया गोखले, प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, प्रा.डॉ.माणिक पाटील व इतर

**मुरगूड (वार्ताहर) :**


"महिलांनी आपले मन व शरीर निरोगी ठेवणे आवश्यक आहे " असे प्रतिपादन ग्रामीण रुग्णालय मुरगगूडच्या डॉ. सुप्रिया गोखले यांनी केले. त्या सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड मधील युवती विकास मंच व अंतर्गत तक्रार निवारण समिती द्वारे विद्यार्थिनींसाठी आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरा- मध्ये बोलत होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी युवती विकास मंचच्या अध्यक्ष प्रा.डॉ.माणिक पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अध्यक्ष पदावरून बोलत असताना प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे म्हणाले की, यांनी महिला हा कुटुंबाचा कणा असतो. तो कणा जपला तरच कुटुंब व्यवस्थित चालते किंबहुना देश व्यवस्थित चालतो, त्यामुळे त्यांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे,असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा कुडवे व अश्विनी पाटील यांनी केले. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थिनींसाठी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले व त्यांना त्यांच्या समस्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच या जागतिक महिला दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये 'महिला सबलीकरण' या विषयावर रांगोळी स्पर्धा व पोस्टर सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. रांगोळी स्पर्धेमधील विजेत्या मुली पुढीलप्रमाणे: प्रथम क्रमांक : कु. सानिका पाटील, द्वितीय क्रमांक : कु. प्रणाली बैलकर, तृतीय क्रमांक विभागून कु. तेजस्विनी एकल आणि कु. प्रज्ञा कुंभार, उत्तेजनार्थ विभागून कु. प्रतीक्षा परीट कु. अनुराधा मोहिते आणि कु.भाग्यश्री परीट. सदर स्पर्धेमध्ये कलाशिक्षक श्री संदीप मुसळे व श्री संभाजी भोसले यांनी परीक्षण केले.

पोस्टर सादरीकरण स्पर्धेमध्ये स्पर्धेमधील विजेते पुढीलप्रमाणे: प्रथम क्रमांक कु. आरती गिरीबुवा, द्वितीय क्रमांक कु. वैष्णवी कुंभार, तृतीय क्रमांक कु. सानिका पाटील, उत्तेजनार्थ कु. सुप्रिया तांबेकर कु. प्रज्ञा कुंभार, कु. तेजस्विनी एकल या स्पर्धेमध्ये वाणिज्य विभागप्रमुख प्रा.डॉ.एम.ए.कोळी व भूगोल विभागाचे डी ए सरदेसाई यांनी परीक्षण केले.

रेट्रो लुक स्पर्धा निकाल:- प्रथम क्रमांक - कु. धनश्री पोवार, द्वितीय क्रमांक - कु. प्रतीक्षा परीट तृतीय क्रमांक - कु. सानिका पाटील, उत्तेजनार्थ -कु. नेहा थोरवत, कु. पद्मजा राऊत यांनी पटकावला. ड्रिन्स लुक स्पर्धेच्या विजेत्या कु. आरती गिरीबुवा व कु. वैष्णवी कुंभार या ठरल्या. सदर स्पर्धेमध्ये प्रा. तानाजी सातपुते प्रा. दीपक साळुंखे व लेफ्टनंट विनोद प्रधान यांनी परीक्षण केले. या स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील जवळजवळ ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी महा-विद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांचे बहुमोल सहकार्य लाभले. या स्पर्धांचे संयोजन युवती विकास मंचचे अध्यक्ष प्रा.डॉ. माणिक पाटील यांनी केले तर सर्व सहकारी महिला प्राध्यापकांनी सहकार्य केले.

## ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन विविध कार्यक्रमांनी संपन्न



प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात ध्वजारोहण पार पडले.

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयामध्ये ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन विविध उपक्रमांनी उत्साहात पार पडला.यावेळी प्रथमत: सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाचा सोहळा पार पडला. याप्रसंगी शारीरिक शिक्षण संचालक प्रा.डॉ.एस.बी.पोवार यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी प्रमुख उपस्थित महा-विद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक एम.आर.बेनके, प्रा.डॉ.एम.ए.कोळी, प्रा.पांडुरंग सारंग आणि ग्रंथालय परिचर श्री.संजय भारमल यांच्या हस्ते ध्वजपूजन आणि श्रीफळ वाढवण्यात आले. तसेच महाविद्यालयाचे कार्यप्रवण प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आणि ध्वजवंदन पार पडले.

यानंतर एनसीसी विभागाच्या वतीने सायलेंट ड्रिल सादर करण्यात आले. एनसीसी चे प्रमुख लेफ्टनंट प्रा.व्ही.ए.प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली कॅडेटनी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने ड्रिल सादर करून सर्वांनी मने जिंकली. यानंतर महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर गीतांचा आणि भाषणांचा कार्यक्रम पार पडला. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी कु. प्रणव कांबळे, मयुर शिंदे, प्राची कळमकर, पायल गोते, तसेच प्रा. तेजस्विनी गुरव यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.यु.आर.शिंदे यांनी तसेच समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. पांडुरंग सारंग यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यप्रवण प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांनी अध्यक्षीय समारोप केला. यावेळी ते म्हणाले की, भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन आज आपण साजरा करत आहोत आणि अशावेळी आपण संविधानाचे पाईक होण्याची गरज आहे. संविधानाने दिलेल्या हक्कांसाठी जसे आपण जागृत असतो त्याचप्रमाणे संविधानाने घालून दिलेल्या मूलभूत कर्तव्यांचे आचरण आपल्याकडून झाले पाहिजे तरच हा प्रजासत्ताक दिन खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल, असे प्रतिपादन त्यांनी केले.

यानंतर कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्रा.डी.व्ही.गोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. सुशांत पाटील यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठी विभागाच्या वतीने भित्तीपत्रकाचे प्रदर्शन




मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने भित्तीपत्रकाचे उद्घाटन करताना कवी गोविंद पाटील, प्र.प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे व इतर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय अंतर्गत मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून भित्तीपत्रकांचे प्रदर्शन करण्यात आले. यावेळी प्रा.सुशांत पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणे कवी गोविंद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये विद्यार्थ्यांनी मराठी भाषे- बद्दलची माहिती, कुसुमाग्रज यांच्या कविता इ. विषयावर पोस्टर तयार केली. यामध्ये शंतनू सावंत, श्रीधर घाडगे, प्राजक्ता नाधवडेकर, अनुजा इंदलकर, नम्रता शेणवी यांनी पोस्टर सादरीकरणामध्ये सहभाग घेतला. आभार प्रा.डी.व्ही.गोरे यांनी मानले.

## सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयामध्ये व्हॉलीबॉल खेळाडूंचा सत्कार समारंभ संपन्न




यशस्वी व्हॉलीबॉल स्पर्धेतील खेळाडू समवेत, आण्णासाहेब थोरवत, प्र. प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, मार्गदर्शक महादेव कानकेकर, प्रा. डॉ. शिवाजी पोवार, संभाजी मांगले व इतर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूडच्या व्हॉलीबॉल संघांने कोल्हापूर विभागीय व आंतरविभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत कोणताही सामना न गमवता निर्विवादपणे वर्चस्व गाजवत प्रथम क्रमांकासह मानाच्या ट्रॉफीज जिंकल्या. तसेच वेस्ट झोन या आंतर विद्यापीठ हॉलीबॉल स्पर्धेसाठी महाविद्यालयातील ओंकार लोकरे, विवेक चौगले, सत्यजित शिंदे या तीन हॉलीबॉल खेळाडूंची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे होणाऱ्या वेस्ट झोन या आंतर विद्यापीठ हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. यासाठी, महाविद्यालयांमध्ये जय शिवराय एज्युकेशन सोसायटी, मुरगूड या संस्थेचे कार्यवाह मा.अण्णासाहेब थोरवत यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयीन यशस्वी खेळाडूंना ट्रॅकसूट देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून शिवराज हायस्कूल व जुनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य महादेव कानकेकर, प्राचार्य जी.के.भोसले, संभाजी मांगले, श्रावण कळांद्रे हे होते. यावेळी स्वागत व प्रास्ताविक शारीरिक शिक्षण संचालक व संघ व्यवस्थापक प्रा.डॉ. शिवाजी पोवार यांनी केले. आभार प्रा. पांडुरंग फराकटे यांनी मानले. तर सूत्रसंचालन प्रा. नितेश रायकर यांनी केले.

या खेळाडूंना मार्गदर्शक महादेव कानकेकर, संभाजी मांगले,प्रा.डॉ. शिवाजी पोवार यांचे मार्गदर्शन मिळाले. तर प्रा.खा. संजय मंडलिक, ॲड. वीरेंद्र मंडलिक, संस्था अध्यक्ष गजाननराव गंगापुरे, कार्यवाह अण्णासाहेब थोरवत, प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांचे प्रोत्साहन लाभले.

## समाजशास्त्र विभागाच्या वतीने 'कामगार समस्या' भित्तिपत्रिकेचे प्रकाशन संपन्न



**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्या वतीने 'असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या समस्या' या विषयावरील भित्तिपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. यामध्ये समाजातील असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या अनेक सामाजिक समस्यांचा उहापोह करून सामाजिक समस्यांविषयी जनजागृती असा आशय मांडण्यात आला. प्रमुख पाहुणे व उद्घाटक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एम.होडगे हे होते. कार्याध्यक्ष विरेंद्रभैय्या मंडलिक यांच्या उपस्थितीत भित्तिपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. पांडुरंग सारंग यांनी केले.

सदर भित्तिपत्रिका लेखनासाठी साक्षी पोवार, पूजा माने, श्रद्धा पाटील, सुमैय्या शेख, स्वाती मगदूम, धनश्री बोटे, सलोनी निलजकर, धनुजा बारड, शुभांगी ढोले, प्रसाद सावलगेकर, शुभम ढोले यांनी लेखन सहकार्य केले. प्रा.डॉ.शिवाजीराव होडगे यांची प्रेरणा व सर्व प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.दिपाली सामंत यांनी केले. आभार व समारोप प्रा. मनीषा पाटील यांनी केला.

## इतिहास विभागामार्फत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी




**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय येथेइतिहास विभागा मार्फतराजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचीजयंती साजरी करण्यात आली. याकार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानिमित्ताने जेष्ठ साहित्यिक व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त एम.जी.गुरव यांचेव्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजीराव होडगे होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयातील इतिहासविभाग प्रमुख डॉ.पी.आर.फराकटे यांनी केले.एम.जी.गुरव यांनी जिजामाता व स्वामी विवेकानंद यांच्या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी हिंदी विभाग प्रमुख प्रा.बेनके, भूगोल विभाग प्रमुख प्रा.सरदेसाई, राज्यशास्त्र विभागाचे प्रा.गोरे, प्रा.चौगुले, तसेच शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.नितेश रायकर तर आभार प्रा.अर्चना कांबळे यांनी मानले.

## बी.सी.ए. विभागाच्या वतीने‘भविष्यातील रोजगाराच्या संधी’ या विषयावर चर्चासत्र संपन्न



प्रमुख पाहुणे म्हणून मनोगत व्यक्त करताना माजी ग्रंथपाल प्रा.टी.एच.सातपुते, प्रा. शंकर पुजारी व उपस्थित इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

बी.सी.ए. विभागाच्या वतीने‘भविष्यातील रोजगाराच्या संधी’ या विषयावर आधारित चर्चासत्र झाले, या चर्चासत्राचे मार्गदर्शन करण्यासाठी डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज, तळसंदे येथील प्रा.शंकर पुजारी, तसेच प्रा.खराडे सर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी ग्रंथपाल प्रा.टी.एच. सातपुते उपस्थित होते. तसेच बी.सी.ए. विभागाचे प्रमुख प्रा.विनायक माने, प्रा.शितल मोरबाळे, प्रा.स्नेहा हवालदार, प्रा.शिल्पा कुडवे, प्रा.अमृता पाटील इ. प्राध्यापक वृंद व बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## अर्थशास्त्र विभागाच्या वतीने केंद्रीय अर्थसंकल्पावरील भित्तीपत्रकाचे उद्घाटन




अर्थशास्त्र विभागातर्फे केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ या विषयावरील भिंतीपत्रिकेचे उद्घाटन करताना ज्येष्ठ अर्थतज्ञ प्रा.डॉ व्ही बी ककडे, प्राचार्य डॉ शिवाजी होडगे व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड अंतर्गत अर्थशास्त्र विभागाच्या वतीने केंद्रीय अर्थसंकल्प भित्तिपत्रकाचे उद्घाटन ज्येष्ठ अर्थतज्ञ प्रा.डॉ.व्ही. बी.ककडे यांच्या शुभ हस्ते व प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, हिंदी विभागाचे प्रा.एम. आर.बेनके, नॅक समन्वयक प्रा.डॉ.एम.एस.पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाले. शासन जनतेच्या कल्याणासाठी अंदाज पत्रक तयार करत असते. अंदाज पत्रकाच्या माध्यमातून पूर्वनिर्धारित उद्दिष्टे गाठण्यासाठी शासन सार्वजनिक साधनसामग्रीचे नियोजन करते. अंदाजपत्रकाच्या माध्यमातून शासनाने घेतलेल्या निर्णयाचा प्रभाव हा अर्थव्यवस्थेवर पडत असतो. या भित्तीपत्रकाच्या माध्यमातून साध्या आणि सोप्या शब्दात अंदाज पत्रकाची मांडणी केली आहे. सर्वसामान्यांना अंदाजपत्रकाची संकल्पना समजावी, त्याची उकल व्हावी, त्यांच्यात अंदाजपत्रकाविषयी जाणीव जागृती निर्माण व्हावी, त्याचबरोबर विद्यार्थ्यांना या विषयाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने या भित्तीपत्रकाचे आयोजन करण्यात आले होते.

सदरचे भित्तीपत्रक बी.कॉम. भाग दोनच्या कु.तन्वी जाधव, कु.प्राची फराकटे, कु.श्रेया कुंभार, कु.वैष्णवी कुंभार, कु.अनुराधा मोहिते या विद्यार्थ्यांनी तयार केले होते. यावेळी प्रा डॉ पी आर फराकटे,प्रा दीपक साळुंखे, प्रा दादासाहेब सरदेसाई, डॉ एच एम सोहनी, प्रा दिगंबर गोरे, प्रा विश्वनाथ चौगुले ,प्रा तृप्ती गवाणकर , प्रा राहुल बोटे व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन अर्थशास्त्र विभागातील प्रा संजय हेरवाडे, प्रा रामचंद्र पाटील , प्रा गुरुनाथ सामंत यांनी केले होते.

## “रोजगार निर्मितीसाठी सॉफ्ट स्किलचे महत्त्व” या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन



**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयातील वाणिज्य विभागांतर्गत बी.कॉम.मधील विद्यार्थ्यांसाठी “रोजगार निर्मितीसाठी सॉफ्ट स्किलचे महत्त्व” याविषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून झाले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक कॉमर्स विभागप्रमुख डॉ.एम.ए.कोळी यांनी केले. त्यांनी प्रास्ताविकामध्ये आजच्या कार्यशाळेचे आयोजन करण्याचा उद्देश व प्रमुख पाहुण्यांची ओळख याविषयी माहिती दिली. त्यानंतर प्रमुख पाहुणे मा.चेतन गोडबोले, निलया ग्रुप ऑफ एज्युकेशन पुणे यांचे स्वागत कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांनी केले. प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे व उपप्राचार्य डॉ.यु.आर.शिंदे व कॉमर्स विभागप्रमुख डॉ.एम.ए.कोळी यांचे स्वागत प्रा.राहुल बोटे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे चेतन गोडबोले यांनी विद्यार्थी व विद्यार्थिनींना कॉमर्स क्षेत्रातील करिअर संधी तसेच वेगवेगळी सॉफ्ट स्किल शिकल्यामुळे कशा पद्धतीने नोकरीच्या संधी उपलब्ध होतात त्याबद्दल मार्गदर्शन केले.

मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांनी विद्यार्थ्यांना त्यांचा स्वतःचा व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी सॉफ्ट स्किलचे महत्व कशा पद्धतीने आहे, तसेच सॉफ्ट स्किल शिकल्यामुळे रोजगार निर्मिती होऊ शकते याबद्दल मार्गदर्शन केले. या एकदिवसीय कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, कॉमर्स विभागप्रमुख डॉ.एम. ए.कोळी, उपप्राचार्य यु.आर.शिंदे, प्रा.टी.व्ही. गवाणकर प्रा.राहुल बोटे व सर्व प्राध्यापक वृंद तसेच बी.कॉम भाग एक,दोन व तीन चे सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते कार्यक्रमाचे आभार प्रा.राहुल बोटे यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.टी.व्ही. गवाणकर यांनी केले.

## रानभाज्या प्रदर्शन व पाककला स्पर्धा उत्साहात संपन्न



रानभाज्या प्रदर्शन व पाककला स्पर्धेचे निरीक्षण करताना पर्यावरण अभ्यासक मा. प्राचार्य मधुकर बाचुळकर तसेच मा. प्राचार्य आदरणीय कळके सर व प्रा. दादासाहेब सरदेसाई व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

लोकनेते स्वर्गीय खासदार सदाशिवराव मंडलिक साहेब यांच्या ९० व्या जयंतीनिमित्त सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात पर्यावरण संसाधन केंद्रामार्फत (ग्रीन क्लब) आयोजित तसेच शिवाजी विद्यापीठ, अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत "रानभाज्या प्रदर्शन व पाककला स्पर्धा" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. रानभाज्या ह्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असून तो एक सकस व पौष्टिक आहार म्हणून ओळखला जातो. अशा रानभाज्यांचा आहारात समावेश करा, असे आवाहन पर्यावरण अभ्यासक मा. प्राचार्य डॉ. मधुकर बाचूळकर यांनी केले. विषारी घटकांची मात्रा नसलेल्या व निसर्गात उगवून येणाऱ्या रानभाज्या यांचा आहारात समावेश करावा व आरोग्य संपन्न जीवन जगता यावं तसेच रान भाज्यांची ओळख, संवर्धन आणि त्याचे महत्त्व लोकांना समजावे या उद्देशाने रानभाज्या प्रदर्शन व पाकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण संस्थेचे सदस्य सचिव मा.डॉ.जयंत कळके होते. त्यांनी ‘आहारातील रानभाज्यांचे महत्व’ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांनी निवडक रानभाज्यांबद्दल माहिती दिली. यावेळी जय शिवराय एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह मा.अण्णासाहेब थोरवत, मा.प्राचार्य डॉ.अर्जुन कुंभार, श्री.सुनील मंडलिक, प्रा.डॉ. उदयकुमार शिंदे, मा.प्रवीण सूर्यवंशी, प्रा.डॉ.सागर पोवार आदी मान्यवर विचारपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. दादासाहेब सरदेसाई यांनी सुरुवातीस स्वागत व प्रास्ताविक केले. अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत विविध महाविद्यालयातील विद्यार्थी- विद्यार्थिनींनी स्पर्धेत उस्फूर्तपणे सहभाग घेतला. सदरच्या रानभाज्या प्रदर्शनात अंबाडा, आघाडा, शेवगा, अळू, भोपळा, पात्री, टाकळी, घोळ, मोहोर, भारंगी, टरकोली अशा विविध दुर्मिळ रानभाजीचा समावेश होता .

स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे: कु. सोनाली तलवेकर (प्रथम) डी.आर.माने कॉलेज, कागल. कु. आदित्य तहसीलदार (द्वितीय) सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड, कु. प्रतीक्षा परीट व कु. दिपाली गुरव (तृतीय) - सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड, कु. प्रणव कांबळे, कु. अनुराधा मोहिते, कु. कीर्ती भांदिगरे, कु. शितल मस्कर (उत्तेजनार्थ). सदर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून मा. सौ. हेमलता कुंभार व प्रा.डॉ. माणिक पाटील यांनी काम पाहिले. यावेळी पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रा.दयानंद कांबळे यांनी परिसरातील वृक्षसंपदा या विषयावर भित्तीपत्रकाचे सादरीकरण केले. तर प्रा. कुमारी तेजस्वी कांबळे यांनी ‘आपली वसुंधरा’ या विषयावर भित्तीपत्रकाचे आयोजन केले. शेवटी आभार प्रा. विनोदकुमार प्रधान यांनी मानले.



# सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय,मुरगूड





## “सर्विस सेक्टर मधील करियरच्या संधी” या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन



**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड वाणिज्य विभागा अंतर्गत बी.कॉम. मधील विद्यार्थ्यां- साठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजित करण्यात आले होते.या एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून झाले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा.डॉ.एम. ए.कोळी यांनी केले. त्यांनी प्रास्ताविकामध्ये आजच्या कार्यशाळेचे आयोजन करण्याचा उद्देश व प्रमुख पाहुण्याची ओळख याविषयी माहिती दिली.

त्यानंतर प्रमुख पाहुणे निकिता मॅडम यांचे स्वागत कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांनी केले. प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांचे स्वागत डॉ.यु.आर.शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे निकिता मॅडम यांनी विद्यार्थी विद्यार्थिनींना सर्विस सेक्टर मधील करियरच्या संधी, तसेच एअर होस्टेस, फ्लाईट अटेंडन्स, ग्राउंड स्टाफ, हॉस्पिटॅलिटी, टुरिझम, इव्हेंट मॅनेजमेंट इ.क्षेत्रांमध्ये करिअरच्या संधी बद्दल मार्गदर्शन केले. मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांनी विद्यार्थ्यांना त्यांचा स्वतःचा व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी मार्गदर्शन केले.

या एकदिवसीय कार्यशाळेसाठी तसेच बी.कॉम.भाग एक, दोन, तीन चे सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार डॉ.यु.आर.शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्र- संचालन प्रा. टी.व्ही. गवाणकर यांनी केले.

## सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय सलग चौथ्या वर्षीही कुस्तीस्पर्धेत चॅम्पियन



यशस्वी मल्लांसमवेत संस्थेचे कार्यवाह श्री. अण्णासो थोरवत, प्र. प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, प्रा. डॉ. शिवाजी पोवार, दादा लवटे व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत, आंतरविभागीय महिला कुस्ती स्पर्धा ह्या नुकत्याच अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी येथे पार पडल्या. या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, व सातारा या तीन जिल्ह्यातून महिला मल्लांनी सहभाग नोंदवला होता. मुरगूडच्या सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या महिला मल्लांनी १५ गुणांची कमाई करत सलग चौथ्या वर्षीही विजेतापदासह जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकाविली. उपविजेते एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड यांनी १३ गुण संपादित केले. तर एस. जी. एम. कॉलेज, कराड व के. एम. सी. कॉलेज, कोल्हापूर यांनी प्रत्येकी ६ गुण संपादित केले. व विभागून जनरल चॅम्पियनशिपच्या तृतीय स्थानावर समाधान मानले. जनरल चॅम्पियनशिप विजेते, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे यशस्वी महिला मल्ल खालील प्रमाणे : १) नेहा चौगले -५० किलो खाली प्रथम २) तन्वी मगदूम- ५९ किलो खाली प्रथम ३) शिवानी मेटकर- ६८ किलो खाली प्रथम या तीनही महिला मल्लांची गुरुकाशी विद्यापीठ, तलवंडी सोबो, पंजाब येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धेकरिता निवड झालेली आहे.

या मल्लांचा सत्कार मंडलिक महा- विद्यालयामध्ये संस्थेचे कार्यवाह व प्रमुख अतिथी म्हणून मा.अण्णासो थोरवत यांच्या हस्ते टी-शर्ट व गुलाब पुष्प देऊन करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे हे होते. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक, संघ व्यवस्थापक प्रा.डॉ. शिवाजी पोवार यांनी केले. तर आभार प्रा.डॉ.पी.आर.फराकटे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. संजय हेरवाडे यांनी केले. या कार्यक्रमास मार्गदर्शक दादा लवटे, उपप्राचार्य डॉ.उदय शिंदे, प्रा. महादेव बेनके, प्रा. पांडुरंग सारंग यांच्यासह महाविद्यालयीन स्टाफ, प्रशासकीय सेवक व इतर उपस्थित होते. या मल्लांना दादा लवटे व संघ व्यवस्थापक प्रा. डॉ. शिवाजी पोवार यांचे मार्गदर्शन लाभले. तर मा. खासदार प्रा. संजय मंडलिक, अ‍ॅड. वीरेंद्र मंडलिक, संस्था अध्यक्ष गजाननराव गंगापुरे, कार्यवाह अण्णासो थोरवत, प्र. प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांचे प्रोत्साहन मिळाले.

## 'मानव हा मोबाईलचा पर्सनल ह्युमन असिस्टंट': मा. अंजली हजारे

### अग्रणी योजने अंतर्गत मंडलिक महाविद्यालयाच्या कार्यशाळेत प्रतिपादन



कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मा. अंजली हजारे, उपस्थित प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्रा.पी.आर.फराकटे, प्रा. दादासाहेब सरदेसाई, प्रा. नितेश रायकर व इतर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय,मुरगूड येथे अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. 'स्पर्धा परीक्षेची तयारी' या विषयावर मुरगूड नगरपरिषद लेखापाल व लेखापरीक्षक मा. अंजली दत्तात्रय हजारे व क्लासवन अधिकारी रोहित सोनाळकर यांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी, कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. नितेश रायकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. तसेच पाहुण्यांची ओळख प्रा.विनोदकुमार प्रधान यांनी करून दिली.

पहिल्या सत्रात स्पर्धा परीक्षेची तयारी या विषयावर बोलताना अधिकारी अंजली हजारे यांनी मुलींच्या शारीरिक, मानसिक व कौटुंबिक दृष्टिकोनातून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास, नियोजन व महत्त्व विशद केले. एमपीएससी, यूपीएससी व सरळसेवा या परीक्षेतील फरक मुलांना सांगून ; तुमची आवड ओळखा, ध्येय ठरवा व प्रयत्न करा, असे प्रतिपादन केले.दुसऱ्या सत्रात क्लासवन अधिकारी मा. रोहित सोनाळकर यांनी नोट्स काढणे, रिव्हिजन करणे व मुलाखत यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे म्हणाले की "सतत प्रयत्न, जिद्द व चिकाटी या गुणांवर असाध्य गोष्ट साध्य करता येते. आपले प्रत्येक स्वप्न सत्यात उतरवता येते. झोपडीत जन्माला येऊन सुद्धा लाल दिव्याच्या शासकीय गाडीत फिरता येते."

या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून लाभलेल्या अधिकारी अंजली हजारे यांनी स्पर्धा परीक्षा विभागासाठी रोख २५०१ रुपये देऊन स्पर्धा परीक्षा विभागाच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. या कार्यशाळेसाठी देवचंद महाविद्यालयाचे यादव सर व विद्यार्थी तसेच दूध साखर महाविद्यालयाच्या पाटील मॅडम व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार आग्रणी महाविद्यालय समन्वयक प्रा.दादासाहेब सरदेसाई यांनी मानले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय हेरवाडे यांनी केले.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंती निमित्त भित्तिपत्रकांचे प्रदर्शन



**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त इतिहास विभागामार्फत भित्तिपत्रकांचे प्रदर्शन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा. एम.आर.बेनके यांच्या हस्ते करण्यातआले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ.पी.आर. फराकटे यांनी केले. त्यानंतर अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ.होडगे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मापासून १६३० ते १६८० पर्यंतचा त्यांचा जीवन प्रवास, त्यांचे कार्य, त्यांच्या जीवनातील अनेक महत्त्वाचे प्रसंग सांगितले. तसेच इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांच्या ग्रंथातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयीचे अनेक दाखले देऊन विद्यार्थ्यांना मौलिक असे मार्गदर्शन केले.

त्यानंतर भित्तिपत्रक बनवलेल्या विद्यार्थीनीनी आपापल्या भितीपत्रकातील मांडलेल्या विषयांचे वर्णन आपल्या शब्दात व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी समाजशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. दिपाली सामंत यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. अर्चना कांबळे यांनी केले. याप्रसंगी नॅक समन्वयक प्रा.डॉ.माणिक पाटील, प्रा.डॉ.एम.ए.कोळी, प्रा.डॉ. सोहनी, प्रा.सरदेसाई, प्रा. दिपक साळुंखे, प्रा. राम पाटील, प्रा. दिगंबर गोरे , प्रा. सुशांत पाटील, प्रा. संजय हेरवाडे, सुमित जाधव, सदाशिव गिरी, रोहित परीट, अलका चौगुले, सारिका आळवेकर तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## इंग्रजी विभागाच्या 'इंग्रजी हस्ताक्षर व शुध्दलेखन आणि वाचन स्पर्धेला'विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद



**मुरगूड (वार्ताहर) :**

सालाबाद प्रमाणे चालू वर्षीही महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाने महाविद्यालयाच्या सर्वच शाखेच्या सर्व विभागांतील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी हस्ताक्षर व शुध्दलेखन आणि वाचन स्पर्धा आयोजित केल्या. सदर स्पर्धा या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाबद्दल आवड निर्माण व्हावी, त्यांची इंग्रजी इस्ताक्षर व वाचन यांसंबंधीची आवश्यक कौशल्ये आणखी विकसित व्हावीत व त्यांचे इंग्रजीचे ज्ञान आणखी समृध्द व्हावे यासाठी विभागाचे लेफ्टनंट प्रा. विनोदकुमार प्रधान दरवर्षी या स्पर्धांचे आयोजन करतात. चालू वर्षी प्रा. प्रधान यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी नोंदणी करण्यासाठी क्यूआर कोड उपलब्ध करून दिला. दोन्ही स्पर्धांसाठी इंग्रजी विभागाकडूनच स्पर्धकांना स्पर्धेचे साहित्य पुरविण्यात आले. विभागाच्या इंग्रजी वाचन स्पर्धा या अभिनव पध्दतीने घेतल्या जातात. यामध्ये सर्व स्पर्धकांचे वाचन ध्वनिमुद्रित करुन पारदर्शीपणे स्पर्धा होण्यासाठी बहिस्थ परिक्षकांची नेमणूक केली जाते.

यावर्षीच्या इंग्रजी हस्ताक्षर व शुध्दलेखन स्पर्धेमध्ये कु. सुप्रिया संजय तांबेकर (बी.ए. भाग ३) हिने प्रथम, कु. वैष्णवी बाजाराव कुंभार (बी.कॉम. भाग २) हिने द्वितीय व कु. धनश्री भारत मगदूम (बी.सी.ए. भाग २) हिने तृतीय क्रमांक पटकवला. तसेच, इंग्रजी वाचन स्पर्धेत श्री. पृथ्वीराज दिपक पाटील (बी.एस्सी. भाग ३) याने प्रथम, कु. शबनम कमालपाशा मुल्ला (बी.ए. भाग ३) हिने द्वितीय, तर कु. प्रतिक्षा भिकाजी वरुटे (बी.सी.ए. भाग ३) हिने तृतीय क्रमांक पटकावला. या सर्व विजेत्यांना महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषक वितरण समारंभामध्ये मान्यवरांच्या हस्ते एक पुस्तक व प्रमाणपत्राच्या स्वरुपामध्ये बक्षीस देऊन गौरविण्यात आले. तसेच सहभागी सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

## महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाने साजरा केला 'भारतीय सेना दिन'



**मुरगूड (वार्ताहर) :**

आमच्या महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाने 'भारतीय सेना दिन' साजरा केला. १५ जानेवारी १९४९ रोजी लेफ्टनंट जनरल कमांडर के.एम.करिअप्पा यांनी भारताचे शेवटचे ब्रिटिश कमांडर-इन-चीफ जनरल फ्रान्सिस रॉय बुचर यांच्याकडून भारतीय सैन्याचे पहिले कमांडर-इन- चीफ म्हणून पदभार स्वीकारला, त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी १५ जानेवारी हा दिवस भारतात लष्कर दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस राष्ट्रीय राजधानी नवी दिल्ली तसेच सर्व मुख्यालयांमध्ये परेड आणि इतर लष्करी कार्यक्रमांच्या स्वरूपात साजरा केला जातो. १५ जानेवारी २०२३ रोजी भारताने बेंगळुरूमध्ये ७५ वा भारतीय सेना दिन साजरा केला. देशाचे आणि नागरिकांचे रक्षण करण्यासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या शूर सैनिकांना सलाम करण्यासाठी लष्कर दिन हा दिवस आहे.

प्रभारी प्राचार्य डॉ.एस.एम. होडगे आणि उपप्राचार्य डॉ.यु.आर.शिंदे यांनी माननीय के.एम. करिअप्पा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. प्रभारी प्राचार्य डॉ. होडगे यांनी अशा प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचे स्मरण केल्याबद्दल एनसीसी विभागाचे अभिनंदन केले. यामुळे एनसीसी कॅडेट्सना देशसेवा करण्यासाठी प्रेरणा मिळेल. म्हणूनच, असे दिवस साजरे केले पाहिजेत, असे ते म्हणाले.

एएनओ लेफ्टनंट व्ही.ए.प्रधान यांनी त्यांच्या प्रस्तावनेत या दिवसाचे महत्त्व सांगितले. उपप्राचार्य डॉ. शिंदे यांनी कॅडेट्स आणि एएनओ यांनी राष्ट्राबद्दल आदर राखण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. द्वितीय वर्षाच्या एनसीसी कॅडेट गायत्री मसवेकर हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि कॅडेट अरुणा रेपे हिने सर्व मान्यवरांचे स्वागत केले तर कॅडेट श्रीगणेश गुरव याने कार्यक्रमाचे आभार मानले. कॅडेट प्रतीक्षा परीट हिने कार्यक्रमासाठी ब्लॅक बोर्ड सजवला. कार्यक्रमासाठी सर्व एनसीसी कॅडेट्स, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

## 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न




प्रकट मुलाखतीदरम्यान बोलताना प्रसिद्ध लेखक भैरवनाथ डवरी, यावेळी प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या महात्मा फुले ग्रंथालयामार्फत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत 'भव्य ग्रंथ प्रदर्शन व एका लेखकाची प्रकट मुलाखत' तसेच 'कथाकथन' हे उपक्रम राबविण्यात आले. या दोन दिवसीय उपक्रमांना विद्यार्थ्यांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी ग्रंथपाल तानाजी सातपुते यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी वाचनाचे व ग्रंथांचे महत्त्व काय आहे हे सांगताना प्रगल्भ, सुसंस्कृत व विकासात्मक समाजासाठी वाचनाचे व ग्रंथांचे योगदान मोठे आहे, असे मत मांडले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे हे होते. ते आपल्या मनोगतामध्ये म्हणाले की, ग्रंथ हे आपले खरे मार्गदर्शक असतात. समाज व संस्कृती समजून घेण्यासाठी वाचन फार महत्त्वाचे असते. तसेच मानवी जीवनामध्ये वाचनाचे महत्त्व फार मोठे आहे. माणूस कितीही प्रगत झाला असला तरी वाचनाचे व ग्रंथाचे महत्त्व काल,आज आणि उद्या असे त्रिकालाबाधित आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

या उपक्रमामध्ये 'गावमाया' कथासंग्रहाचे लेखक भैरवनाथ डवरी यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली. यावेळी त्यांनी आपल्या 'गावमाया' या कथा-संग्रहाबाबत सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की, साहित्य हा मानवी जीवनाचा आरसा असून माझ्या कथा या आपल्याच परिसरातील ग्रामीण भागातील दैनंदिन जीवनाच्या अनेक प्रसंगांतून घडलेल्या असून त्यांना वास्तवतेचा गाभा आहे. या कथांना वाङ्यीन साज चढवलेला असून त्यामुळे त्या वास्तववादी व हृदयस्पर्शी बनलेल्या आहेत. सदर प्रकट मुलाखतीमध्ये प्रा.डॉ.माणिक पाटील, प्रा. दादासाहेब सरदेसाई, प्रा.डॉ.एम.ए.कोळी, प्रा. विश्वनाथ चौगले, प्रा. दिगंबर गोरे, प्रा. सोनाली कुंभार, प्रा. मनीषा पाटील, प्रा. दिपाली सामंत तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या प्रश्नांना श्री. डवरी यांनी समर्पक उत्तरे दिली.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुशांत पाटील यांनी केले. या कार्यक्रमासाठी ग्रंथालयातील कर्मचारी श्री.संजय भारमल, श्री.सदाशिव गिरीबुवा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी बहु-संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.एम.ए.कोळी यांनी मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.

## 'झूलॉजीकल उपकरणे आणि ग्रंथालय भेट' यावर एकदिवसीय कार्यशाळा




ग्रंथालय भेटीवेळी उपस्थित प्राध्यापक व सर्व विद्यार्थी.

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयातील बीएस्सी भाग - १ मधिल झूलॉजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी देवचंद कॉलेज, अर्जुननगर येथे एकदिवसीय 'झूलॉजीकल उपकरणे आणि ग्रंथालय भेट' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला. यावेळी तेथील रिर्सच लॅब्स मध्ये असणारी विविध उपकरणे कशी हाताळली जातात, याची माहीती दिली तसेच तेथील पुस्तके, खंड, ईबुक्स, पुस्तकांची देवाण घेवाण कशा पध्दतीने केली जाते ते देखील चांगल्या प्रकारे सांगितले. या प्रसंगी देवचंद कॉलेजच्या मा.प्राचार्य डॉ.जी.डी.इंगळे,देवचंद कॉलेज झूलॉजीचे विभागप्रमुख प्रा.डॉ.लंका, सहा. प्रा.डॉ.नदाफ, सदाशिवराव मंडलिक महा-विद्यालयातील झूलॉजी विभागप्रमुख प्रा.अभिजीत कांबळे, प्रा.सोनाली बाबर, आणि बीएस्सी भाग -१चे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## मराठी विभागाच्या वतीने पत्रकार दिन साजरा



दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त पत्रकार दिन साजरा करताना प्र.प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, पत्रकार भैरवनाथ डवरी व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयामध्ये दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा विभाग व ग्रामीण पत्रकारिता विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार दिन साजरा करण्यात आला. स्वागत आणि प्रास्ताविक प्रा. सुशांत पाटील यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्र.प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी पत्रकारांची भूमिका महत्त्वाची असते. तसेच यावेळी त्यांनी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवनाचा आढावा घेतला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पत्रकार भैरवनाथ डवरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रा.विश्वनाथ चौगले यांनी मानले. यावेळी प्रा.टी.एच.सातपुते, प्रा.एम आर बेनके, प्रा.पी आर फराकटे, प्रा.डी.व्ही गोरे, प्रा.डी.ए.सरदेसाई, डॉ.एम.ए.कोळी, प्रा.रामचंद्र पाटील, प्रा.विनायक माने, प्रा.संजय हेरवाडे आणि ग्रामीण पत्रकारितेचे विद्यार्थी उपस्थित होते.

## अखिल भारतीयआंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत तन्वी मगदूमचे यश



**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाची तन्वी मगदूम हिने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत (महिला विभाग) तृतीय स्थान पटकावले. या स्पर्धा गुरुकाशी विद्यापीठ तलवंडी साबो, भटींडा, पंजाब येथे १४ ते १८ जानेवारी २०२५ रोजी पार पडल्या होत्या.

या खेळाडूला दादा लवटे, प्रा. डॉ. शिवाजी पोवार यांचे मार्गदर्शन लाभले. तर मा. खासदार प्रा. संजयदादा मंडलिक, संस्था अध्यक्ष गजाननराव गंगापुरे, ॲड. विरेंद्र मंडलिक, कार्यवाह अण्णासाहेब थोरवत, प्र. प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांचे प्रोत्साहन लाभले.

## राज्यशास्त्र विभागाच्या वतीने 'राष्ट्रीय मतदार दिन' उत्साहात साजरा



**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड अंतर्गत राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित '२५ जानेवारी -राष्ट्रीय मतदार दिवस' उत्साहात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कार्यप्रवण प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे होते. यावेळी प्रा.डी.व्ही.गोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

यावेळी प्रमुख उपस्थित समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा.पांडुरंग सारंग यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, आपल्या लोकशाहीचा अभिमान आपण बाळगायला हवा. कारण या लोकशाहीमुळेच आज आपले स्वातंत्र्य, अधिकार सुरक्षित आहेत. आज महिलांना राजकीय आरक्षण दिल्यामुळे त्यांचा या प्रक्रियेवरील विश्वास वाढलेला आहे. तसेच देशातील अनेक संविधानिक पदे महिलांनी भूषवलेली आहेत. त्यामुळे उद्याच्या काळात तुमच्यातील कोणीतरी राष्ट्रपती, पंतप्रधान होतील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यप्रवण प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना आपण सर्वांनी देशाचे आदर्श नागरिक म्हणून भूमिका बजावताना कोणत्याही आमिषाला बळी न पडता आणि जात, धर्म, पंथ या सर्वांच्या पलीकडे जाऊन एक भारतीय म्हणून निर्भयपणे मतदान करणे आवश्यक आहे, असे मत मांडले. तसेच सर्वांनी मतदानाचा पवित्र हक्क बजावावा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

यावेळी प्रा. सुशांत पाटील यांनी मतदार प्रतिज्ञेचे वाचन केले. तसेच उपस्थित सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी कॉमर्स फॅकल्टी हेड प्रा.डॉ.एम.ए.कोळी, भूगोलशास्त्र विभागप्रमुख प्रा. दादासाहेब सरदेसाई, प्रा. संजय हेरवाडे, प्रा. अमृता पाटील आणि विदयार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'ई-बँकिंग' विषयावरील भित्तीपत्रकाचे उद्घाटन



ई-बँकिंग विषयावरील भित्तीपत्रकाचे उद्घाटन करताना प्रा.डॉ.के.एस.पवार, प्रा.डॉ.यु.आर.शिंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात अर्थशास्त्र आणि वाणिज्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने ई - बँकिंग या विषयाच्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सध्या अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडून येत आहेत, त्याला बँकिंग क्षेत्र अपवाद नाही. बँकिंग क्षेत्रामध्ये ई - बँकेच्या माध्यमातून क्रांती झाली आहे, असं म्हणायला हरकत नाही. रोकडविहिरीत आर्थिक व्यवस्थेला सक्षम करण्यासाठी ई बँकिंग मधील क्रेडिट कार्ड, डिबेट कार्ड, आर.टी.जी.एस, एन.ई.एफ.टी., मोबाईल बँकिंग, यु.पी.आय. आणि आय.एम.पी.एस इत्यादी सेवा प्रामुख्याने बँका ग्राहकांना देत आहेत याची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना असावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून महाविद्यालयात ई - बँकिंग ही संकल्पना घेऊन बी.ए भाग दोन आणि बी.कॉम भाग दोन या वर्गातील विद्यार्थिनींच्या सहभागातून भित्तिपत्रक तयार करण्यात आले.

या भितीपत्रकाचे उद्घाटन अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा.डॉ.के.एस.पवार आणि वाणिज्य विभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ.यु.आर.शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एम.होडगे, डॉ. ग.गो.जाधव महाविद्यालय, गगनबावडा येथील प्राचार्य प्रा.डॉ.टी.एम.पाटील, अर्थशास्त्र विभागातील प्रा.रामचंद्र पाटील, राज्यशास्त्र विभागाचे प्रा.विश्वनाथ चौगुले, वाणिज्य विभागातील प्रा.राहुल बोटे आणि प्रा.तृप्ती गवाणकर, प्रा.डॉ.दिपाली सामंत इ.उपस्थित होते. मनिकर्णिका खाटांगडे, सानिका वड्डु, चैत्राली पाटील, पूजा जांभळी, तेजस्विनी परीट, नाझिया पटेल, सानिका सुतार, संजना कुदळे, श्वेता वैद्य, पद्मजा राऊत, मधुरा जाधव, तन्वी जाधव, साक्षी बेलेकर, निकिता सुतार, श्रेया कुंभार, वैष्णवी कुंभार, प्राची फराकटे आणि समीक्षा प्रभावळे या विद्यार्थ्यांनी भित्तिपत्रक तयार करण्यामध्ये सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत प्रा. डॉ. गुरुनाथ सामंत यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. सौ. सोनाली कुंभार यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय हेरवाडे यांनी केले.

## गारगोटी स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन




**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १३/१२/१९४२ गारगोटी स्वातंत्र्य लढ्यातील शहीद झालेल्या क्रांतिकारकांच्या स्मृति प्रित्यर्थ हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. या घटनेला जवळपास ८२ वर्षे लोटली असली तरी सुदूधा त्यांच्या आठवणी आज देखील क्रांतीज्योतीच्या रूपाने तितक्याच ताज्या आहेत. आपल्याच परिसरातील हे क्रांतिकारक गारगोटी स्वातंत्र्य लढ्यात हुतात्मे झाले आणि आपल्या नावाबरोबर आपल्या गावचे नाव सुदूधा भारताच्या समग्र इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवले. या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ गारगोटी येथे सात पाकळ्यांचे भव्य स्मारक उभारलेले आहे. हे स्मारक आजही येणाऱ्या पिढीला नवीन स्फूर्ती, नवी चेतना देत खंबीरपणे उभे आहे.

महाविद्यालयाचे कार्यतत्पर प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या हस्ते क्रांतीज्योतीला पुष्पहार अर्पण करून क्रांतिकारकांना अभिवादन करण्यात आले. यावेळी ते म्हणाले की, आज २१ व्या शतकात स्वातंत्र्याचा उपभोग घेत असलेल्या आजच्या युवा पिढीला हा गारगोटीचा रणसंग्राम समजावा, त्यांच्यापर्यंत हा इतिहास पोहोचावा या उद्देशाने हा हुतात्मा दिन म्हणून साजरा होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.उदयकुमार शिंदे यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यातील स्मृतींना उजाळा दिला.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य समन्वयक डॉ.एम.ए.कोळी, प्रा रामचंद्र पाटील, प्रा.टी.एच. सातपुते, ले.विनोद प्रधान आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. संजय हेरवाडे यांनी केले. आभार प्रा. दिगंबर गोरे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. सुशांत पाटील यांनी केले.



# सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय,मुरगूड

• वर्ष १५ वे • मार्च २०२५ • पान नं.६



## अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत 'संभाषण कौशल्य' या विषयावर कार्यशाळा संपन्न



कार्यशाळेच्या प्रथम सत्रामध्ये बोलताना प्रा.डॉ.कल्पना गंगातीरकर. यावेळी उपस्थित प्र.प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्रा.डॉ.माणिक पाटील व इतर मान्यवर

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड मधील अंतर्गत गुणवत्ता कक्ष आणि इंग्रजी विभाग यांच्यामार्फत 'मॅनेजिंग इफेक्टि व कम्युनिकेशन स्किल' या विषयावर एकदिवसीय लीड कॉलेज अंतर्गत वर्कशॉप संपन्न झाला. सदर वर्कशॉपचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या हस्ते कुंडीतील रोपट्याला पाणी घालून करण्यात आले. याप्रसंगी स्वागत व प्रास्ताविक कार्यशाळेच्या समन्वयक प्रा.डॉ.सौ. एम एस पाटील यांनी केले.

कार्यशाळेच्या प्रथम सत्रामध्ये महावीर महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या प्रा.डॉ.सौ.कल्पना गंगातीरकर यांनी "मॅनेजिंग इफेक्टिव कम्युनिकेशन स्किल" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी बोलत असताना त्यांनी संभाषणाचे विविध पैलू, त्यामध्ये येणारे अडथळे, संभाषण कौशल्य कशी सुधारावे, यासाठी विविध प्रसार माध्यमांचा कसा वापर करावा याबद्दल विस्तृत विवेचन केले. त्याचबरोबर त्यांनी व्यवहारांमधील विविध उदाहरणे देऊन प्रथम योग्य श्रोता होऊन, विविध निरीक्षणे करून, वारंवार प्रॅक्टिस करून कशी एखादी व्यक्ती उत्तम इंग्रजी बोलू शकते व अस्खलित संभाषण करू शकते याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. प्रथम सत्रामध्ये दूधसाखर महाविद्यालय, बिद्रीचे इंग्रजी विभागप्रमुख डॉ.सी.वाय.जाधव यांनी अध्यक्षपद भूषविले.

कार्यशाळेच्या द्वितीय सत्रामध्ये महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मा.डॉ. ए. डी कुंभार यांचे "मॅनेजिंग इफेक्टिव कम्युनिकेशन स्किल ॲट वर्क प्लेस" या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. कुंभार सर यांनी कामाच्या ठिकाणी कसे संभाषण साधावे व त्याला उत्तर द्यावेत याबाबतीत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी लीड कॉलेज अंतर्गत येणाऱ्या विविध महाविद्यालयातील अनेक शिक्षक व अनेक विद्यार्थी यांनी व तसेच महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. द्वितीय सत्रामध्ये देवचंद कॉलेज, अर्जुननगर येथील इंग्रजी विषयाच्या प्रा.डॉ. दीपा मडिवाल यांनी अध्यक्षपद भूषविले. कार्यशाळेच्या शेवटी सहसमन्वयक लेफ्टनंट व्ही.ए.प्रधान यांनी आभार व्यक्त केले. या कार्यशाळेसाठी लीड कॉलेज स्कीमचे महाविद्यालयातील समन्वयक प्रा.डी.ए. सरदेसाई आणि इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.ए.डी.जोशी यांचे विशेष सहकार्य लाभले.

## मराठी भाषा गौरव दिनानिमित 'कविता सुचते अशी' व्याख्यानाचे आयोजन




मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रसिध्द कवी गोविंद पाटील. यावेळी उपस्थित प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्रा.एम.आर. बेनके, प्रा.टी.एच.सातपुते.

**मुरगूड (वार्ताहर) :**

बाळ पहिल्यांदा भाषा शिकते ती म्हणजे आईच्या ओवीतून आणि म्हणूनच आपल्या बाळासाठी आईच्या पोटातून तिच्या ओठावर ओवी येते, ती कविता असते, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी गोविंद पाटील यांनी केले. ते मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या मराठी विभागांतर्गत आयोजित केलेल्या 'कविता सुचते अशी' या विषयावरील व्याख्यानादरम्यान बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कार्यप्रवण प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे होते.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, कविता सुचण्यासाठी आपलं व्यक्तिमत्व समृद्ध असणं गरजेचे आहे. त्यासाठी चौफेर वाचनाची आवश्यकता आहे, असा मोलाचा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. यावेळी त्यांनी सादर केलेल्या कविवर्य कुसुमाग्रज आणि प्र.के.अत्रे यांच्या कवितांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच त्यांच्या स्वरचित 'कर्जात जन्मलो आम्ही' व 'बाप' या कवितांनी उपस्थितांची मने हेलावून टाकली. यावेळी कोणतीही भाषा जिवंत ठेवण्याचे काम कुठले ग्रंथ किंवा पुस्तके करत नाहीत तर ते काम बोली भाषा करत असते, असे मत त्यांनी मांडले. यावेळी मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधत सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयामध्ये कार्यरत कार्यालयीन अधीक्षक श्री.महादेव भोई तसेच प्रयोगशाळा सहाय्यक श्री. सुमित जाधव, सुनिल कडाकणे यांनी मराठी विषयातून पदवी प्राप्त करून यशस्वी वाटचाल केलेबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे म्हणाले की, कवितेतून आनंद मिळतो, जीवनाचा मार्ग कळतो. कविता लिहायची असेल तर अनेक कवितासंग्रह तुम्ही वाचले पाहिजेत. भोवतालच्या परिस्थितीकडे डोळसपणे बघून त्यावर भाष्य करता आले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच मराठी भाषा रुजली पाहिजे, वाढली पाहिजे आणि टिकली पाहिजे यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक ज्येष्ठ प्रा. एम.आर.बेनके यांनी केले. प्रमुख वक्त्यांची ओळख प्रा.टी.एच.सातपुते यांनी करून दिली. सूत्रसंचलन प्रा. सुशांत पाटील यांनी तर आभार प्रा.संजय हेरवाडे यांनी मानले. यावेळी प्रा.विश्वनाथ चौगले, प्रा.विनायक माने, प्रा.डी.पी.साळुंखे, प्रा.दादासाहेब सरदेसाई, ले.प्रा.विनोद प्रधान, प्रा.डी.डी.खतकर, प्रा. गुरुनाथ सामंत, प्रा. शितल मोरबाळे,प्रा. मनिषा सावेकर, प्रा. दिपाली सामंत, प्रा.एम.ए.कुदळे, प्रा.पी.एस.गायकवाड यांसह इतर प्राध्यापक वृंद, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

## रयत शिक्षण संस्थेची महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती मंजूर



गुणवत्ता शिष्यवृत्तीचा धनादेश सुपूर्त करताना महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, ज्युनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य महादेव कानकेकर व इतर

**मुरगूड (वार्ताहर) :**

महाराष्ट्रातील एक अग्रगण्य रयत शिक्षण संस्थेच्या प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या प्राचार्य पी.जी. पाटील प्रतिष्ठान व सौ. सुमतीबाई पाटील प्रतिष्ठान, सातारा यांच्या वतीने सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षातील दिली जाणारी बॅरिस्टर पी.जी. पाटील गुणवत्ता शिष्यवृत्ती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्राप्त झाली. यामध्ये कु. आदित्य रंगराव केसरकर (बी.ए.भाग-१) कु. प्राजक्ता प्रकाश पाटील (बी.ए. भाग-१) कु. श्रावणी रामचंद्र शिंत्रे (बी.ए.भाग-१) व कु. प्राजक्ता मधुकर आडूरे (बी.ए.भाग-२) या विद्यार्थिनींना वरील गुणवत्ता -शिष्यवृत्तीचे धनादेश (प्रत्येकी २०००/-) विद्यार्थी गुणगौरव समारंभात शिवराज कॉलेजचे माजी प्राचार्य मा. महादेव कानकेकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव होडगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील शिष्यवृत्ती विभागाचे समन्वयक प्रा. दादासाहेब सरदेसाई, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डी.पी.साळुंखे, जिमखाना विभागप्रमुख डॉ. शिवाजी पोवार, प्रा.सौ.अर्चना कांबळे, प्रा.डॉ.गुरुनाथ सामंत इ. मान्यवर उपस्थित होते.

## महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन दिमाखात साजरे



**मुरगूड (वार्ताहर) :**

महाविद्यालयामध्ये दिनांक २०, २१ व २३ मार्च २०२५ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. यामध्ये दि.२० मार्च रोजी पारंपारिक वेशभूषा व फॅन्सी ड्रेस स्पर्धा पार पडल्या. या पारंपारिक वेशभूषा स्पर्धेमध्ये बी.सी.ए. विभागाने प्रथम क्रमांक प्राप्त केला. तर स्क्वॉड ग्रुप व रॉयल ग्रुप यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केले. तर फॅन्सी ड्रेस स्पर्धेमध्ये संदेश सोनाळकर ग्रुप यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच श्रीगणेश गुरव व संकेत किल्लेदार यांनी द्वितीय क्रमांक तर प्रतीक्षा परीट हिने तृतीय क्रमांक मिळवला.

दिनांक २१ मार्च रोजी शाहीर रणजीत कांबळे यांचा हास्य जत्रा हा विनोदी कार्यक्रम सादर करण्यात आला तसेच याच दिवशी शेलापागोटे हा कार्यक्रम घेण्यात आला. दिनांक २२ मार्च रोजी सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन जय शिवराय एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष मा. ॲड.विरेंद्र मंडलिक यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पारंपारिक वेशभूषा व फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.दीपक साळुंखे यांनी केले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद प्रधान यांनी केले. या स्नेहसंमेलनात सर्व विद्यार्थी, प्राध्यापक उत्साहाने सहभागी झाले होते.

## महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींचा प्रतिष्ठेच्या 'मानिनी' पुरस्काराने सन्मान



अन्नपूर्णा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च, संकेश्वर द्वारा दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'मानिनी' पुरस्कार स्विकारताना मंडलिक महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी

**मुरगूड (वार्ताहर) :**

अन्नपूर्णा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च, संकेश्वर द्वारा दिला जाणारा मानाचा पुरस्कार जो संशोधन, समाजकार्य, कला कौशल्य अशा विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या तसेच उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींना दिला जातो. या पुरस्काराने सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयातील धनश्री प्रवीण पोवार-बीए भाग ३, शबनम कमालपाशा मुल्ला- बीए भाग ३ या दोन विद्यार्थिनींचा 'मानिनी' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. विद्यार्थिनींच्या बरोबरच महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाच्या प्रा. मनीषा पाटील आणि इतिहास विभागाच्या प्रा. अर्चना कांबळे यांना सन्मानित करण्यात आले.

यासाठी प्राचार्य डॉ.एस.एम.होडगे यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिला मानिनी तसेच विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाला शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नेतृत्वगुण विकासासाठी अभिमत विद्यार्थी संसद उपयुक्त - प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांचे प्रतिपादन




अभिमत विद्यार्थी संसदेमध्ये मार्गदर्शन करताना प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे. यावेळी उपस्थित प्रा.डी.व्ही.गोरे, प्रा. पांडुरंग सारंग, प्रा.डॉ.एम.ए.कोळी, प्रा. धनाजी खतकर व सभापतीच्या भूमिकेत कु. साहिल कांबळे.

**मुरगूड (वार्ताहर) :**

'अभिमत विद्यार्थी संसद' विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुणांचा विकास करण्यासाठी उपयुक्त असल्याचे मत मंडलिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी व्यक्त केले. ते मंडलिक महाविद्यालयाच्या 'राज्यशास्त्र विभागा'मार्फत आयोजित ३१ व्या 'अभिमत विद्यार्थी संसद' या कार्यक्रमा प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. तसेच 'अभिमत विद्यार्थी संसद' हे राज्यशास्त्र विभागाचे वेगळेपण असून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जागरूकता निर्माण करण्याचे काम या माध्यमातून होत आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी संविधानाच्या प्रास्ताविकेला पुष्पहार अर्पण करून संसदेच्या कामकाजाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच यावेळी प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.पांडुरंग सारंग, प्रा.डॉ.एम.ए.कोळी उपस्थित होते. दोन्ही प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतामध्ये 'अभिमत विद्यार्थी संसद' या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे विशेष कौतुक केले. सदर अभिमत संसदेमध्ये देशातील तसेच राज्यातील महत्त्वाच्या प्रश्नांवर साधक-बाधक चर्चा घडवून आणण्यात आली. देशातील वाढती बेरोजगारी, वाढती महागाई अशा ज्वलंत प्रश्नांवर संसदेच्या कामकाजा दरम्यान गदारोळ झाला. एकंदरीत गोंधळाच्या वातावरणात संसदेतील प्रश्नोत्तराचा तास पार पडला.

याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक प्रा.डी.व्ही.गोरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुशांत पाटील यांनी केले तर आभार प्रा. विश्वनाथ चौगले यांनी मानले. यावेळी प्रा.डॉ.माणिक पाटील, प्रा.तानाजी सातपुते, प्रा. धनाजी खतकर, प्रा. संजय हेरवाडे, प्रा.एच.एम.सोहनी, प्रा. दादासाहेब सरदेसाई, प्रा.राहुल बोटे, प्रा.गुरुनाथ सामंत प्रा.दिपाली सामंत, प्रशासकीय कर्मचारी सुमित जाधव, सतिश खराडे, सुनिल कडाकणे तसेच विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.